पुणे महानगरपालिका

*** स्थायी समिती ***

कार्यपत्रिका क्रमांक २३

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. ११/८/२००९** रोजी सकाळी ११:३० (साडे अकरा) वाजता **म.जोतिबा फुले सभागृहात** (स्थायी समिती सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

**उत्पन्नाचा आढावा**

**विषय क्र. ४८४**

दि. २२/७/२००९ ते २८/७/२००९ अखेर आयातकर कार्यालयाचा जमा उत्पन्नाचा, रहदारी व बिगरजकात पकडलेल्या वाहनांचा व दंडात्मक कार्यवाहीबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांनी पत्र क्र. अतिमआ(ज) १३५ दि. १/८/२००९ ने पाठविलेला तपशील माहितीसाठी.

**घनकचरा व्यवस्थापन आढावा**

**विषय क्रं. ४८५**

पुणे महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापनाविषयी पाठविलेला साप्ताहिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.उप आयुक्त, घन कचरा व्यवस्थापन यांचे क्र. एसडब्ल्युएमओ/६३० दि. ३०/७/२००९ चे पत्र.

**विषय क्रं. ४८६**

पुणे महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापनाविषयी पाठविलेला साप्ताहिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.उप आयुक्त, घन कचरा व्यवस्थापन यांचे क्र. एसडब्ल्युएमओ/६६६ दि. ६/८/२००९ चे पत्र.

**मा.सभासदांचे प्रस्ताव**

**विषय क्र. ४८७**

मा.सौ.वर्षा तापकिर व मा.मोहनसिंग राजपाल यांचे दि. ९/८/२००९ चे पत्र.

वॉर्ड १३३ मध्ये स.नं. २३/२/४, समता नगर आंबेगाव ब्रु. ४ गुंठे जागा मोकळी असून पुणे मनपाच्या ताब्यात घेऊन या जागेवर व्यायाम शाळा व समाज मंदिर बांधण्यात यावे.

**विषय क्र. ४८८**

मा.चंद्रकांत मोकाटे, उपमहापौर व मा.सागर माळकर यांचे दि. ४/८/२००९ चे पत्र.

कु. घोरपडे आरती बजरंग, रा. पुणे, ही गेली अनेक वर्षे जलतरण स्पर्धेत भाग घेतला असून तीला आंतरराष्ट्रीय जलतरणपट्टू छत्रपती पुरस्कार मिळालेला आहे.

कु. आरती घोरपडे हीची सहाव्या एशियन वयोगट आंतरराष्ट्रीय चॅम्पियनशीय साठी निवड झाली असून सदर स्पर्धा दि. ४ ते १४ ऑगस्ट २००९ रोजी जपान मधील टोकियो येथे आहे. सदर स्पर्धेत भाग घेण्यासाठी र.रू.८६,५००/– इतका खर्च येणार आहे.

तरी कु. आरती घोरपडे हीला पुणे महानगरपालिकेकडून आर्थिक मदत म्हणून र.रू.५०,०००/– देण्यात यावे.

**माहितीसाठी आलेले विषय**

**विषय क्रं. ४८९**

दि. १३/७/२००९ ते दि. १९/७/२००९ अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे म.न.पा.च्या हद्दीत लागलेल्या एकुण १८ आगींबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांनी पत्र क्र. मआ/अशाद/२४१ दि. ४/८/२००९ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

**विषय क्रं. ४९०**

दि. २०/७/२००९ ते दि. २६/७/२००९ अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे म.न.पा.च्या हद्दीत लागलेल्या एकुण २१ आगींबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांनी पत्र क्र. मआ/अशाद/२४२ दि. ४/८/२००९ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

Unregistered

## हिशोब तपासणी अहवाल

**विषय क्रं. ४९१**

मुख्य लेखापाल कार्यालय तसेच विविध क्षेत्रिय कार्यालयाकडील सन २००८-०९ या आर्थिक वर्षातील टेंडर प्रकरणे व तद्नुषंगिक कागदपत्रातील तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी जा.क्रं मुलेप/२६१ दि. ३१/७/२००९ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्रं. ३३ सन २००९-२०१० चा विचारासाठी.

## ठरावान्वये आलेले अभिप्राय

**विषय क्रं. ४९२**

वॉर्ड क्रं.९६, आर्चिड पॅलेस ते कोरियंथन क्लब पर्यंतचा डी.पी. रस्ता करणे. या कामाचे र.रू.३७.५० लाख तरतूदीचे वर्गीकरण करणेबाबत मा. प्रमोद भानगिरे यांचे दि. २७/५/०९ चे पत्रावर झालेला स्थायी समिती ठराव क्रं. १८३, दि.२/६/०९ ला अनुसरून मा.अति.महा.आयुक्त (वि) यांनी पत्र क्रं.मआ/पथ/२१७ दि.३१/०७/०९ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**विषय क्रं. ४९३**

वॉर्ड क्रं.९६, मध्ये स.नं.२७ महंमदवाडी मधून जाणारा रस्ता करणे. या कामाचे र.रू. ५० लाख तरतूदीचे वर्गीकरण करणेबाबत मा. प्रमोद भानगिरे यांचे दि. २७/५/०९ चे पत्रावर झालेला स्थायी समिती ठराव क्रं. १८४, दि.२/६/०९ ला अनुसरून मा.अति.महा.आयुक्त (वि) यांनी पत्र क्रं.मआ/पथ/२१८ दि.३१/०७/०९ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**विषय क्रं. ४९४**

विवाह नोंदणीसाठी येणाऱ्या दांपत्यांना दोन झाडे लावणे बंधनकारक करणेबाबत मा.सौ.कमल व्यवहारे यांचे दि. १८/६/०९ चे पत्रावर झालेला स्थायी समिती ठराव क्रं. २८८, दि.२३/६/०९ ला अनुसरून मा.अति.महा.आयुक्त (वि) यांनी पत्र क्रं.मआ/उद्यान/२२० दि.३१/०७/०९ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

## सर्वात कमी रक्कमेची टेंडर्स

**विषय क्रं. ४९५**

स.नं.४९/१, बाणेर येथील जैव विविधता उद्यानाच्या बाजूने आर सी सी सिमाभिंत बांधणे या कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या १२ टेंडसपैकी ठेकेदार मे. सद्गुरू कन्स्ट्रक्शन कंपनी यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु ३,००,०३,७९०=०० पेक्षा १५.३५७% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये २,५३,९६,१०७ = ९७ अधिक भाववाढ सुत्रानुसार होणाऱ्या रक्कमे पर्यंतचे काम करुन घेणेसाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/उकाजा/२१६ दि. ३१/७/२००९ चे पत्र.

**विषय क्रं. ४९६**

धानोरी स.नं. १५ येथील ई.एस.आर. टाकीसाठी वॉचमन क्वॉर्टर बांधणे व स्थापत्य विषयक कामे करणे या कामासाठी टेंडर्स मागविली असता आलेल्या ०६ टेंडसपैकी ठेकेदार मे.जी. के. परमार यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु ३५,३३,३३०=६० पेक्षा १५.९९% कमी (तडजोडीने) ) असल्याने त्यांचेकडून त्यांचे टेंडर दरानुसार र.रुपये २९,६८,३५१= ०४ रक्कमे पर्यंत काम करुन घेणेसाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पा.पु./२१९ दि. ३१/७/२००९ चे पत्र.

UnRegistered

**विषय क्रं. ४९७**

पुणे मनपाच्या विविध क्षेत्रिय कार्यालयासाठी १०० लिटर्स क्षमतेचे प्लास्टिक बकेट खरेदी करणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडसपैकी ठेकेदार मे. उमा प्लॅस्टोवेअर प्रा.लि.पुणे यांच्याकडून मा. अति.महा.आयुक्त (वि) यांच्या विषय पत्रातील टेंडर स्पेशिफीकेशन प्रमाणे १०० लिटर्स क्षमतेच्या प्लॅस्टिक बकेट प्रति नगास रू.४००/- या प्रमाणे १२७५० नगासाठी एकूण रक्कम रूपये ५१,००,०००=०० (सर्व करासह) पर्यंत खरेदी करण्यास त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/उआ/तांत्रिक/२२३ दि. १/०८/२००९ चे पत्र.

**विषय क्रं. ४९८**

पुणे महानगरपालिकेच्या मोटारींना लागणारे सर्व प्रकारचे ऑईल खरेदी करणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडसपैकी ठेकेदार मे. राज पेट्रो स्पेशॅलिटीज प्रा.लि. मुंबई यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे असल्याने त्यांचेकडून मा. अति. महा.आयुक्त (ज) यांच्या विषयपत्रात नमूद केलेल्या तक्त्यानुसार र.रुपये ४९,३०,१८२= ०० पर्यंत त्यांच्या अटी स्विकारून होणाऱ्या रक्कमे पर्यंत खरेदी करणेसाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र.मआ/उआ/व्हे.डे./२२५ दि. १/८/२००९ चे पत्र.

**विषय क्रं. ४९९**

वॉर्ड क्रं.११७, महर्षीनगर, वसंतबाग, ऋतूराज, सुपार्श्वनाथनगर, परिसरामध्ये जुन्या व जीर्ण जलवाहिन्या बदलणे या कामासाठी टेंडर्स मागविली असता आलेल्या ८ टेंडसपैकी ठेकेदार मे. अक्षय एंटरप्राईजेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु २१,२४,४६१=०० पेक्षा १४.८०% कमी) असल्याने त्यांचेकडून त्यांचे टेंडर दरानुसार र.रुपये १८,१०,०४०= ७७ रक्कमे पर्यंत काम करुन घेणेसाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र.मआ/वि.अ./पा.पु./२२८ दि. ३/८/२००९ चे पत्र.

**विषय क्रं. ५००**

बालाजीनगर, काशिनाथ पाटीलनगर, पुण्याईनगर भागास पाणीपुरवठ्यात सुधारणा कामे करण्याकरीता विविध ठिकाणी जलवाहिनीचे अर्धवट नेटवर्क पूर्ण करणे या कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडसपैकी ठेकेदार श्री. संजय शांताराम धनकवडे यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु १४,९९,१८१=०० पेक्षा ११.०१% कमी) असल्याने त्यांचेकडून त्यांचे टेंडर दरानुसार र.रुपये १३,३४,१२१= १७ रक्कमे पर्यंत काम करुन घेणेसाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र.मआ/वि.अ./पा.पु./२२९ दि. ३/८/२००९ चे पत्र.

Unregistered

**विषय क्रं. ५०१**

सणस शाळा ते नांदेड गाव दरम्यान वडगाव जलशुद्धीकरण प्रकल्पामधून पाणीपुरवठा करणेकरीता जलवाहिनीचे अर्धवट नेटवर्क पुणे करणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडसपैकी ठेकेदार श्री. संजय शांताराम धनकवडे यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु १८,७४,९६०=०० पेक्षा ११.१२% कमी) असल्याने त्यांचेकडून त्यांचे टेंडर दरानुसार र.रुपये १६,६६,४६४=४५ रक्कमे पर्यंत काम करुन घेणेसाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र.मआ/वि.अ./पा.पु./२३० दि.३/८/२००९ चे पत्र.

**विषय क्रं. ५०२**

मनपा शाळा क्रं.१९६, बी वारजे पहिल्या मजल्यावर तीन वर्गखोल्या बांधणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडसपैकी ठेकेदार मे. आकार इंजिनिअर्स ॲन्ड डेव्हलपर्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु २१,८६,६६४/- पेक्षा १४.९५% कमी) असल्याने त्यांचेकडून त्यांचे टेंडर दरानुसार र.रुपये १८,५९,७५७=७३ रक्कमे पर्यंत काम करुन घेणेसाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र.मआ/भवन/२३१ दि. ३/८/२००९ चे पत्र.

**विषय क्रं. ५०३**

स्व.राजीव गांधी प्राणीसंग्रहालय कात्रज येथे बॅटरीवर चालणाऱ्या गाड्यांसाठी पार्किंग विकसीत करणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडसपैकी ठेकेदार दिनेश पंडीतराव खराडे यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु १६,३२,९१३=०० पेक्षा १३.१% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये १४,१९,००१= ४० रक्कमे पर्यंत काम करुन घेणेसाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/उद्यान/२३२ दि. ३/८/२००९ चे पत्र.

**विषय क्रं. ५०४**

पुणे महानगरपालिकेच्या उद्यान विभागाकडील स्व.राजीव गांधी प्राणीसंग्रहालय कात्रज येथे प्राण्यांसाठी लसुण घास पुरविणे या कामासाठी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडसपैकी सर्वात कमी रक्कमेचे ठेकेदार मे. शिल्पा एंटरप्राईजेस यांचेकडून प्रति किलो रू. ६.९० पैसे या प्रमाणे एकूण २५५५०० परिमाणा करीता १७,६२,९५० पर्यत खरेदी करण्यास व त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/वि.अ./उद्यान/२३३ दि. ३/८/२००९ चे पत्र.

**विषय क्रं. ५०५**

पुणे महानगरपालिकेच्या उद्यान विभागाकडील स्व.राजीव गांधी प्राणीसंग्रहालय कात्रज येथे प्राण्यांसाठी फळे व भाजीपाला पुरविणे या कामासाठी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडसपैकी सर्वात कमी रक्कमेचे ठेकेदार मे. शिल्पा इंटरप्राईजेस यांचेकडून मा. अति. महा.आयुक्त (वि) यांच्या विषयपत्रासोबत जोडलेल्या तुलनात्मक तक्त्यानुसार र.रुपये २४,६०,१५३=७५ पर्यत खरेदी करण्यास व त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/वि.अ./उद्यान/२३४ दि. ३/८/२००९ चे पत्र.

**विषय क्रं. ५०६**

मौजे कात्रज स.नं.३ येथील पार्कसाठी आरक्षित असलेल्या जागेवर जॉगिंग ट्रक विकसित करणे या कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ११ टेंडसपैकी ठेकेदार श्री. सुनिल आप्पासाहेब मुराबट्टे यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु २४,८९,९५०=०० पेक्षा ३०.९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. १७,२०,५५५=४५ पर्यंतचे काम करुन घेणेसाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/उद्यान/२३५ दि. ३/८/२००९ चे पत्र.

**विषय क्रं. ५०७**

जे.एन.आर.यु.एम. अंतर्गत मौजे कात्रज स.नं.१४६ येथील तलावाच्या बाजूने नागरिकांसाठी जॉगिंग ट्रक विकसित करणे या कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ७ टेंडसपैकी ठेकेदार श्री. सुनिल आप्पासाहेब मुराबट्टे यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु २५,६१,२६२=५० पेक्षा २२.९०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. १९,७४,७३३=३९ पर्यंतचे काम करुन घेणेसाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/उद्यान/२३६ दि. ३/८/२००९ चे पत्र.

**विषय क्रं. ५०८**

स्व. राजीव गांधी प्राणीसंग्रालय कात्रज अस्वल व नील गाय खंदकाजवळ नागरिकांसाठी शौचालय बांधणे या कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडसपैकी ठेकेदार मे. सद्‌गुरू कन्स्ट्रक्शन कंपनी यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु ३८,३८,८५०=०० पेक्षा १४.९७% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ३२,६४,१७४=१६ रक्कमे पर्यंत काम करुन घेणेसाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/उद्यान/२३७ दि. ३/८/२००९ चे पत्र.

**विषय क्रं. ५०९**

स्व. राजीव गांधी प्राणीसंग्रालय कात्रज येथे नागरिकांसाठी चार ठिकाणी विश्रांतीसाठी जागा विकसीत करणे या कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडसपैकी ठेकेदार मे.व्ही.व्ही. असोसिएटस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु१७,७७,०८८/- पेक्षा ९.६५% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. १६,०५,५९९=०१ पर्यंत काम करुन घेणेसाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/उद्यान/२३८ दि. ३/८/२००९ चे पत्र.

UnRegistered

### टेंडर्स न मागविता

**विषय क्रं. ५१०**

पुणे महानगरपालिकेच्या सांख्यिकी व संगणक कार्यालयासाठी सन सर्व्हरचा २४ x ७ गोल्ड सपोर्ट खरेदी करण्यासाठी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (वि) यांचे क्र. मआ/सांख्यिकी व संगणक/२२२ दि. १/८/२००९ चे पत्र.

१. मे. विप्रो लि. यांचेकडून सन सर्व्हरसाठी २४ x ७ गोल्ड सपोर्ट हा मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे शेड्यल्ड चॅप्टर ५(२)२ नुसार घेणेस
२. मे. विप्रो लि. कंपनीस वरील कामासाठी र.रू.७,०१,२६२ याप्रमाणे दि.१२/७/०९ पासून ३ वर्षाकरीता रक्कम रू.२१,०३,७८६/– (अक्षरी एकवीस लाख तीन हजार सातशे श्याऐंशी फक्त) आदा करणेस
३. मे. विप्रो लि. कंपनीशी तद्‌नुषंगीक करारनामा करणेस.

**विषय क्रं. ५११**

आरोग्य कार्यालयाकडील कमला नेहरू रूग्णालय व डॉ. नायडु रूग्णालयाकडील रूग्णांना दररोज लागणारे अनुक्रमे ३६,००० लिटर्स व १८,००० लिटरर्स दुध दि. १/४/२००९ ते ३१/०३/२०१० या मुदतीसाठी शासकीय दुध योजना पुणे यांचे कडून शासनाकडे उपलब्ध असलेल्या साठ्या नुसार प्रति लिटर ठिकाण पोहोच दर गाईचे दुध र.रू. २०.३० या दरात अगर हायकॉट दुध प्रतिलिटर रू.२०.४० या दराने होणारी रक्कम रू.११,०१,६००/– (अक्षरी अकरा लाख एक हजार सहाशे फक्त) पर्यंत अगर रूग्णालयातील रूग्णांच्या संख्येत प्रासंगिक वाढ झाल्याने जादा दुध लागल्यास त्याप्रमाणे होणाऱ्या रकमे पर्यंत अगर शासनाकडून वेळोवेळी कमी जास्त करण्यात येणाऱ्या दुधाच्या दरानुसार येणाऱ्या रक्कमे पर्यंत मुंबई प्रांतिक अधिनियम १९५९ चे शेड्यल्ड चॅप्टर ५(२)२ नुसार दुध पुरविण्यासाठी शासकीय दुध योजना पुणे यांचेकडून करारनामा न करता दुध खरेदी करण्यासाठी मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे क्र. मआ/आरोग्य/२२७ दि. ३/८/२००९ चे पत्र.

(टिप:– सदर खरेदी रक्कम रू.३०००/– पेक्षा जास्त होत असल्याने मनपा अधिनियमानुसार टेंडर्स मागविणे जरूरीचे आहे. तथापि ही खरेदी राज्यशासनाच्या अधिकृत अशा शासकीय दुध योजनेकडून होत असल्याने व या पेक्षा कमी दर येण्याची शक्यता नसल्याने ही खरेदी शासकीय दुध योजना पुणे (गव्हर्मेंट मिल्क सप्लाय स्किम ) यांचे कडून टेंडर न काढता खरेदी करण्यात येत आहे.)

### सर्वात जास्त रकमेची टेंडर्स

**विषय क्रं. ५१२**

पुणे महानगरपालिकेच्या मालकीचे पुणे पेठ शिवाजीनगर स.न.९७ गोखलेनगर येथील सावित्रीबाई फुले सभागृह भाडे तत्वावर चालविणेस देणेकामी निविदा मागवल्या असता आलेल्या ६ निविदांपैकी अ.क्रं. १चे निविदाधारक अस्लम करीम मिरजकर,६४,जनवाडी ,पुणे.१६ यांची निविदा मनपा अपेक्षित रकमेपेक्षा सर्वात जास्त म्हणजेच मासिक भाडे र.रुपये २२,१२२/– इतकी असल्याने त्यांना पुणे पेठ शिवाजीनगर स.न.९७ गोखलेनगर येथील सावित्रीबाई फुले सभागृह क्षेत्रफळ ३३४.२० चौ.मी. बांधकाम ताबा दिनांकापासून ५ वर्षे कालावधीसाठी मासिक भाडे र.रुपये २२,१२२/– स्विकारुन भाडे तत्वावर चालविणेस देणेस, मासिक भाडे प्रतिवर्षी २.५% भाडेवाढ करणेस, याकरिता त्यांचेशी निविदा अटी शर्ती नुसार आवश्यक तो करारनामा करणेस तसेच मनपाचे येणारे अन्य शासकीय सर्व कर सदरच्या ठेकेदाराने वेळच्या वेळी भरणेस व ताबा देणेपुर्वी ६ महिन्याचे मासिक भाडे रक्कम अनामत म्हणून व ३ महिन्याचे मासिक भाडे रक्कम आगाऊ स्विकारणेस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/भूसंपादन/२४४ दि. ६/८/२००९ चे पत्र.

### मागील सभेचे विषय

**विषय क्र. ५१३**

मा.सुनिल बिबवे व मा.हनिफ शेख यांचे दि. ३०/७/२००९ चे पत्र.

स्थायी समिती ठराव क्र. २४१ दि. १६/६/२००९ चा फेरविचार करुन मुळ विषयपत्र मान्य करणेबाबत

(विषय – पुणे शहरात विविध रस्त्यांवर व चौकामध्ये अधिकृत रिक्षा स्टॅण्ड फलक बसविणेबाबत)

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. ४/८/२००९ च्या सभेत ठरले होते.)

UnRegistered

**विषय क्र. ५१४**

केंद्र शासन अनुदानीत प्रकल्पाअंतर्गत मे.सेल्को इंटरनॅशनल प्रा.लि. हैदराबाद यांचेबरोबर सवलतीचा करारनामा करणेस व ५ वर्षाचे कालावधीनंतर त्यांना लॅंडफिल डेव्हलपमेंट व लॅंडफिल मेंन्टेनन्स पोटी फी अदा करणेस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/आरोग्य/१२२ दि. ६/६/२००९ चे पत्र.
(टिप : सदर विषयाची जागा पाहणी करावी असे दि. ३०/६/२००९ च्या सभेत ठरले होते.त्याप्रमाणे जागा पाहणी झाली.)
(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. ४/८/२००९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ५१५**

पुणे, पेठ येरवडा स.नं. १०१अ/१/१/१ (पैकी), सि.स.नं. २०५९, फा.प्लॉट नं. ३ (पैकी), स.नं. १०२ अ/१ अ (पैकी), सि.स.नं. २०६४, फा.प्लॉट नं. ३ (पैकी), स.नं. २३४ (पैकी), सि.स.नं. २०५८, फा.प्लॉट नं. ३ (पैकी) ही मिळकत ६० मी.डी.पी.रस्त्यासाठी (नगर रस्ता) आरक्षित जागेने बाधित होत आहे. भूमी आणि जिंदगी कार्यालयाकडून टी.डी.आर./एफ.एस.आय.पोटी दि. ४/४/२००९ रोजी १६०७०.५२ चौ.मी.क्षेत्राचा ताबा घेण्यात आला असून दि. १६/४/२००९ रोजी मिळकत पत्रिकेवर नोंद झालेली आहे. सदर मिळकतीचा भूसंपादनाचा उद्देश पूर्ण झालेला आहे. त्यानुसार सदर मिळकत भूसंपादनाच्या कार्यवाहीतून वगळणेबाबत मा.जिल्हाधिकारी, पुणे यांना जा.क्र. एलएक्यू/ओ/१९८ दि. ३०/४/२००९ अन्वये कळविण्यात आले आहे. सदरची बाब अवलोकनार्थ सादर करणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्रं. मआ/भूमीप्रापण/१९४ दि. ९/७/२००९ चे पत्र.
(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. ४/८/२००९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्रं. ५१६**

देवाची ऊरुळी/फुरसुंगी या गावांमध्ये करावयाच्या विविध विकास कामांसाठी व दैनंदिन निर्माण होणाऱ्या कचरा विल्हेवाटीसाठी शास्त्रोक्त पध्दतीने करावयाच्या उपाययोजना व प्रक्रिया प्रकल्पासाठी सन २००९–१० च्या भांडवली व खास निधीच्या अंदाजपत्रकातील अत्यावश्यक सेवा व मुख्य लेखापाल यांनी नमूद केलेल्या परिशिष्टातील योजनांची तरतूद वगळून यामुळे १६२५ कोटीमधून उर्वरित र.रुपये ८०५.५६ कोटीमधून सरसकट ५.५०% कपात करुन, वर्गीकरणाने सुमारे ४४.३० कोटी उपलब्ध करुन मिळणे व पान क्र. ५७, ९. पथांची झाडलोट, अ.क्र. १५, प्रभाग क्र. ५२ गांडुळखत प्रकल्पासाठी रुपये ४०० लक्ष महसूली तरतूदीचे विक्रेंद्रीत पध्दतीने बायोगॅस प्रकल्प उभारणेसाठी खर्ची करणेसाठी मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/घनकचरा/२१२ दि. २८/७/२००९ चे पत्र.
(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. ४/८/२००९ च्या सभेत ठरले होते.)

Unregistered

## संकिर्ण

**विषय क्रं. ५१७**

त्रिदलनगर वसाहतीत ड्रेनेज लाईन टाकणे (ग्राउटींग व बिटूमिनस मॅकॅडम पेव्हर फिनिशरने करणे इ.सह) या कामाची निविदा मुळ मान्य टेंडर दराने र.रू. २२,९७,३५३ = ११ पर्यत पूर्ण करून घेण्यांत येणार असून मुळ मान्य टेंडरच्या दिडपटीचे काम र.रू.(३४,४६,०२९.६७ – २२,९७,३५३.११ = ११,४८,६७६.५६) ११,४८,६७६.५६ पर्यत ॲटपार दराने ठेकेदार मे. बी.एन.चव्हाण यांचेकडून करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज)यांचे क्र. मआ/उआ /वि.का.क्रं.२ /२२४ दि. १/८/२००९ चे पत्र.

**विषय क्रं. ५१८**

पुणे मनपाच्या विद्युत विभागासाठी २ x २४ वॅट टी – ५ स्ट्रीट लाईट फिटींग ५० % वाढीव परिमाणाने मे. विनवॉक सिस्टिमस् आयएनसी,नाशिक यांचेकडून रूपये १९७५/– प्रती नग याप्रमाणे १५०० नगासाठी र.रू.२९,६२,५००/– (सर्वकरांसह)खरेदी करणेस व खरेदीपोटी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (वि)यांचे क्र. मआ/उआ/तांत्रिक/२३९ दि. ३/८/२००९ चे पत्र.

**विषय क्रं. ५१९**

पुणे.पेठ घोरपडी गांव स.नं. ४९ व ५०/१ (वटारे मळा) येथिल मिळकतीमधून जाणारा ९मी.डी.पी.रस्ता भूसंपादन कायद्यान्वये अथवा तडजोडीने संपादन करणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/भुमीप्रापण /२४३ दि. ६/८/२००९ चे पत्र.

**विषय क्र. ५२०**

मा.संतोष आरडे यांचे दि. ६/८/२००९ चे पत्र.

स्थायी समिती ठराव क्र. १४३ दि. २६/५/२००९ चा फेरविचार करण्यात येऊन अंदाजपत्रकामध्ये सुचविण्यात आलेले पूर्वीचेच काम करण्यात यावे.

(विषय –वॉर्ड क्रं.२० येथे विविध ठिकाणी पावसाळी लाईन टाकणेकरीता र.रू.१० लाखाचे वर्गीकरण करणे.)

**विषय क्र. ५२१**

मॉरिसेसच्या समाज कल्याण मंत्री मा.शीला बाय बापू यांनी त्यांचे शिष्टमंडळा समवेत दि. २७/१/२००९ रोजी पुणे शहरास भेट दिली त्यां प्रसंगी झालेल्या खर्चास मान्यता मिळणेबाबत मा. नगरसचिव जा.क्रं.२०५४, दि. ६/०८/२००९ चे पत्र.

सुनिल पारखी
नगरसचिव,
पुणे महानगरपालिका.

**(टिप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) मा.नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**

UnRegistered